



## श्रीमठ-स्थैर्याचे शिल्पकार

# ✿ श्रीपद्मनाभतीर्थ ✿




श्रीपद्मनाभतीर्थांचे गुरू श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ

# श्रीमठ-स्थैर्याचे शिल्पकार

# श्रीपद्मनाभतीर्थ

शत सांवत्सरिक पुण्यतिथि
आषाढ शु॥ ७मी शके १९१४

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी
पर्तगाळ (गोवा)

SHREEMUTT-STHAIRYACHE SHILPKAR : SHREEPADMANABHTEERTH

❋

**प्रकाशन तिथि :**
शतसांवत्सरिक पुण्यतिथिनिमित्त प्रकाशन
आषाढ शु॥ ७ मी शके १९१४
सोमवार, दि. ६ जुलै, १९९२

❋

**संकलक व प्रकाशक :**
चंद्रकांत शांताराम केणी,
श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी,
पर्तगाळ (गोवा) ४०३ ७०२

❋

**अक्षर जुळणी व मुद्रकः**
सुरेश ति. शे. काकोडकार
ओमेगा एन्टरप्राएझेस,
श्रेयस, विद्यानगर कॉलनी, विद्यानगर,
मडगांव - ४०३ ६०१ (गोवा)

# श्रीमद्‌इंदिरांचे शिलेदार - श्रीकमलानाथतीर्थ

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या गुरुपरंपरेंत अशीं अनेक उदाहरणे आहेत कीं शिष्यस्वामींनीं आपले गुरू पीठावर असतांना स्वतःचें निराळें अस्तित्व कटाक्षाने समाजासमोर येऊ दिलें नाहीं. गुरुवर्यांच्या प्रतिमेंत एकरूप होऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाला व कार्याला पोषक-पूरक अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळेंच श्रीमठाच्या इतिहासांत गुरु-शिष्य संबंधांचे एक अखंड मधुर पर्व पहायला मिळतें.

अनेकदां गुरुवर्यांचा प्रभाव इतका तेजस्वी व व्यापक असायचा आणि त्यांचें व्यक्तिमत्व इतके उत्तुंग असायचें कीं गुरुवर्यांचें अवतारकार्य संपल्यानंतर श्रीमठाचें व समाजाचें पुढें काय होईल असा प्रश्न मठहितैषी समाजवर्गाला भेडसावयाचा. पण एखाद्या तेजःपुंज ताऱ्याच्या अस्ताबरोबरच तितकाच तेजस्वी नवा तारा क्षितिजावर चमकावा तशा प्रकारचा अनुभव शिष्यस्वामीजींच्या गुरुपीठारोहणाबरोबरच यायचा. याच कारणासाठीं श्रीमठपरंपरेंतील प्रत्येक स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाचें स्वतंत्रपणे मूल्यमापन करणें हें एक अवघड काम होऊन बसलें आहे. त्यांतहि ज्या स्वामीजींना पट्टाभिषेकानंतर आपला कार्यव्याप विस्तारण्यासाठीं पुरेसा अवधि अथवा उसंत मिळाली त्यांची गोष्ट निराळी; पण जे स्वामीजी पीठारोहणानंतर अल्पावधींतच मुक्त झाले त्यांच्या व्यक्तिमत्वाची कथा आणि कार्यसिध्दीची गाथा गुरुवर्यांच्या जीवनकार्यांत कायमची झाकोळलेली राहिली आहे.

गुरूंच्या व्यक्तिमत्वामध्यें पूर्णपणे आत्मविलोपन करून बसलेल्या श्रीमठ परंपरेतील आधुनिक कालखंडांतील दोन आचार्यांचीं नांवें चटकन् नजरेंत भरतात. असे एक महर्षि म्हणजे श्रीमठ परंपरेंतील एकोणिसावे स्वामी श्रीपद्मनाभतीर्थ व दुसरे एकविसावे स्वामी श्रीकमलानाथतीर्थ हे होत.

श्रीकमलानाथतीर्थ हे आपले गुरुवर्य प्रकांड पंडित व तपस्वी योगी श्रीमद् इंदिराकांत तीर्थांच्या सावलीचें जीवन जगले. पण ती सावली निर्जीव नव्हती. प्रसंगीं गुरूंच्या ताठ पाठकण्याचा टेकू बनून ती त्यांना आधार द्यायची, तर कधीं गुरूंनी सोडलेले संकल्प सिद्धीस नेण्यासाठीं पार्श्वभागीं कार्यरत रहायची. श्रीकमलानाथतीर्थ पीठावर पुरते एक वर्ष देखील राहिले नाहींत. पण कसोटीच्या कालखंडांत परंपरेच्या साखळींतील एका महत्वाच्या दुव्याचें काम त्यांनी केलें. नव्या युगाची नांदी श्रीइंदिराकांततीर्थांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या पर्वांत सुरू झाली होती आणि

श्रीकमलानाथतीर्थ गुरुपीठावर आले त्यावेळीं कोणत्याहि क्षणीं नव्या युगाची पहाट फुटण्यासारखी परिस्थिति होती. अशा संधिकालांत नव्या युगाचा वेध घेऊन जुन्या समृद्ध परंपरेशीं फारकत येऊं न देतां श्रीमठाच्या व समाजाच्या कार्याची धुरा समर्थ हातीं सोपविण्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केलें आणि आपले शिष्य श्रीद्वारकानाथतीर्थ यांना योग्य ते संस्कार देणे हेंच आपलें मुख्य कार्य मानलें.

## विरक्त तत्त्वज्ञ

दुसरे शिष्यस्वामी श्रीपद्मनाभतीर्थ हे विरक्त वृत्तीचे, प्रसिद्धि पराङ्मुख तत्त्वज्ञ होते. धर्मशास्त्राची व्यवहाराशीं सांगड घालून गुरूंनी ठरवून दिलेल्या सिद्धांताच्या चौकटींत समाजांतील कलह मिटवून समाज व्यवस्थेला स्थैर्य देण्याचें कार्य त्यांनी आपल्या गुरूंच्या कारकीर्दींत प्रामुख्याने अंगिकारलें. तब्बल अडतीस वर्षेत्यांनी शिष्य स्वामींची भूमिका नम्रतेनें बजावली. गुरुवर्य श्रीमदूपूर्णप्रज्ञतीर्थ यांच्या उपस्थितींत श्रीपद्मनाभतीर्थांनी नेहमी दुय्यम पण महत्त्वाची भूमिका घेतली. त्यांच्या कार्यकुशलतेवर अढळ विश्वास असल्यामुळेंच गुरुवर्य श्रीमद् पूर्णप्रज्ञतीर्थ सतत भ्रमण, अखंड चिंतन-मनन आणि समाजप्रबोधन करीत आजीवन हिंडले. यात्राकाळांत देखील जेथें जेथें ते पोंचले तेथें तेथें त्यांनी अनेक नवीं नवीं कार्ये सुरू केलीं व पुढें गेले. एक प्रकारे ते नवनवीन क्षेत्रें पादाक्रांत करीत व आपली दिग्विजयी मोहीम अविरत चालू ठेवीत. त्यांच्या यात्रेचा व कार्याचा मागोवा घेण्याचें काम श्रीपद्मनाभतीर्थांनी स्वतःकडे घेतलें आणि जेथें जेथें गुरूवर्यांनी संचार केला तेथें तेथें त्यांच्या आदेशाने वा इच्छेने सुरू झालेल्या योजनांना आकार देऊन त्या कार्यरत ठेवण्याचें काम केलें.

श्रीपद्मनाभतीर्थ यांचे कार्य एखाद्या भव्य वास्तूच्या आधारशिलेसारखे राहिलें आहे. लोकदृष्टीपासून ते दूर राहिले एवढ्याचसाठीं त्यांचें महत्त्व कमी लेखतां येणार नाहीं. धर्मशास्त्र निपुण असल्यानें श्रीमठकक्षेंतील तसेंच विविध देवमंदिरांतील धार्मिक विधि व उत्सव यथासांग पार पडतात याची ते दक्षता घेतच; शिवाय मठाच्या कक्षेंतील व्यवहार चोख रहावा यासाठीं ते विशेष खबरदारी घेत. गुरुवर्यांच्या दीर्घ अनुपस्थितीमुळें मठक्षेत्रांत अनास्था किंवा मरगळ येऊ नये यासाठीं ते वेळोवेळीं उपाय घेत. त्याकाळीं समाजांतील तंटे व कलह सरकारी न्यायालयांत नेण्यापेक्षां मठानुयायी वर्ग श्रीस्वामीजींकडेच आपल्या कैफियती घेऊन जात आणि सर्व संबंधितांचें समाधान होईल अशा पध्दतीने श्रीपद्मनाभतीर्थ त्यांचें निवारण करीत. मठाच्या मालकीच्या जमिनीची नीट मशागत राखून तिचा सदुपयोग होईल याची काळजीहि ते वाहात.

गुरुवर्य श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ म्हणजे अनन्य साधारण विद्वान आणि तप व अध्यात्मिक साधनेने तेजस्विता प्राप्त करून घेतलेले एक श्रेष्ठ महर्षि. त्यांच्या विद्वत्तेची व विरक्तीची

कीर्ति अक्षरशः आसेतु-हिमाचल पसरलेली. अखंड ज्ञानसाधना व परमतत्त्वाशीं तादात्म्य पावलेली विरक्ती यांतच ते मश्गुल राहात. अशा गुरूंच्या शिष्यांवर अनेकविध जबाबदाऱ्या स्वाभाविकपणे येऊन पडतात. गुरुभक्तीला तडा जाऊं न देतां स्वतःची अध्यात्मसाधना त्यांनी चालू ठेवली आणि श्रीमठाच्या संस्थापनेपासून त्याच्या विस्ताराची बारीकसारीक माहिती अभ्यासून घेतली. समाज व गुरुपीठाकडील संबंध कसे विकसित झाले व पुढें ते कसे रहावे याबद्दल त्यांनी निश्चित अशीं मतें बनविलीं. एक प्रकारें गुरुवर्य पीठावर असताना श्रीपद्मनाभतीर्थांनी आपली वैयक्तिक साधना अखंड चालविली. गुरुपीठारोहणानंतर तुलनेने कारकीर्दीचा अल्पकाळ त्यांच्या वाट्याला आला. तसे ते तेरा वर्षे व पस्तीस दिवस गुरूपदावर राहिले; पण या काळांत त्यांना एका अकल्पित आव्हानाला तोंड द्यावें लागल्यामुळें एक प्रकारची संघर्षमय कारकीर्द त्यांच्या वाट्याला आली. पण मठाच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या चोखंदळ जिज्ञासूंना त्यांच्या अल्प पण महान कारकीर्दीचा ठसा श्रीमठाच्या ऐश्वर्यावर व इतिहासावर कायमचा उमटला आहे हें जाणवल्या शिवाय राहणार नाहीं.

## आश्रम दीक्षा

श्रीपद्मनाभतीर्थ यांचे जन्मगांव कर्नाटकाच्या उत्तर कन्नड जिल्ह्यांतील होन्नावर हें होय. जन्मानंतर आई-वडिलांनी नारायण असे नांव ठेवले होते. वडील श्री व्यंकटेश भट हे एक नम्र अर्चक. देवसेवा करण्यांतच ते कृतार्थता अनुभवीत. कुटुंबाला योग्य संस्कार मिळावे एवढा त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या मुलाची कुशाग्र बुध्दि व बाल वयांतहि त्याच्या अंगीं मुरलेली नम्रता पाहून मठाधीश श्रीमद्पूर्णप्रज्ञतीर्थांचें त्या मुलाकडे लक्ष वेधलें आणि आपले शिष्य बनण्यास हा बालक सर्वथा अनुरुप आहे याची खात्री पटल्यानंतर त्यांनी बटूला गोकर्ण मठांत आश्रमदीक्षा दिली. तो दिवस माघ शुध्द पंचमीचा होता. शक १७६१.

गुरू अत्यंत विद्वान होते. पाठशालांतील विद्यार्थ्यांना स्वतः पाठ देण्याची त्यांना आवड होती. शिष्य-स्वीकार केल्यानंतर श्रीपद्मनाभतीर्थांच्या शिक्षणाची जबाबदारी गुरुवर्यांनी स्वतःकडे घेतली. त्यामुळें श्रीपद्मनाभतीर्थ यांना उत्तम शिक्षण घेण्याचें भाग्य लाभलें. श्रीमध्वाचार्य रचित 'ब्रह्मसूत्रा' वरील भाष्य, न्याय, व्याकरण, तर्क आदि विषयांचा श्रीपद्मनाभतीर्थांचा व्यासंग फार मोठा होता. सुरूवातीच्या काळांत गुरूवर्यांनी आपल्या शिष्यांसह अनेक तीर्थयात्रा केल्या. शिक्षण व संस्कारांचा तो एक भागच होता. तिरुपति, धनुष्कोडी, अनंतशयन (त्रिवेंद्रम), मंजेश्वर, उडुपी, बसरूर, गोकर्ण आदि तीर्थांच्या यात्रा गुरूंनी शिष्यांसमवेत केल्या. गुरुवर्यांच्या यात्रा अखंड चालू राहिल्याने मठक्षेत्रांतील कारभाराची किंचित आबाळ होत आहे ही गोष्ट शिष्य

श्रीपद्मनाभतीर्थांनी हेरली आणि गुरूंच्या संमतीने त्यांनी नंतरचा अधिकाधिक काळ पर्तगाळी ह्या मुख्य मठांत वास्तव्य करून मठाचा कारभार सांभाळण्यांत घालविला. गुरूवर्यांना आपलें अंगीकृत कार्य निर्विघ्नपणें पार पाडतां यावें यासाठीं आवश्यक असलेलें मन:स्वास्थ्य व अनुकूल वातावरण शिष्य या नात्याने श्रीपद्मनाभतीर्थ यांनीच निर्माण केलें.

शके १८०१ मधील ज्येष्ठ शुध्द द्वितियेच्या दिवशीं श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ वृंदावनस्थ झाल्यानंतर त्यांचे शिष्य श्रीपद्मनाभतीर्थ तेरा वर्षे व पस्तीस दिवस पीठावर राहिले व त्या काळांत त्यांची तत्त्वनिष्ठा व ध्येयपूर्तीसाठीं अपार कष्ट उपसण्याची क्षमता प्रकर्षाने नजरेंत भरली. त्यांच्या कारकीर्दीतील सर्वांत मोठे कार्य म्हणजे हिंदुद्वेष्ट्या जुलमी पोर्तुगीज सत्तेविरुद्ध चिवट झुंज देण्यासाठीं त्यांनी उचललेलीं कांहीं धाडसी पावलें होत. एक प्रकारें तें अग्निदिव्यच होतें

## इतिहासांतील वादळी काळ

श्रीशालिवाहन शकाचा सतराशें पन्नास ते अठराशें दहा हा साठ वर्षांचा काळ भारतीय इतिहासांतील वादळाचा काळ गणला जातो. या कालावधींत शेष भारतावर ब्रिटिश सत्तेची मगरमिठी पूर्णपणे आवळली गेली आणि गोव्यांत पोर्तुगीज सत्ता स्थिरस्थावर झाली. गोमंत प्रदेशाची व्याप्ति याच कालावधींत संकुचित झाली. अन्यथा सप्तकोंकणांतील महासप्तम गणली जाणारी अपरान्तची ही सुवर्णभूमि विद्यमान गोव्याच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडेहि विस्तारलेली होती. श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी मठाचें मुख्यालय पोर्तुगीज प्रदेशांत व रिवण तथा डिचोली वगळतां इतर मठ व उपमठ दुसऱ्या राजवटीच्या अधिसत्तेखालीं अशी विभागणी कायम झाली. समाजांतहि या स्थित्यंतराचे पडसाद उमटूं लागले होते. गोव्यांतील तथाकथित नव्या काबिजादी पोर्तुगीजांच्या हातीं आल्यावर पोर्तुगीज राज्यांत हिंदु धर्माची व भारतीयत्वाची पताका फडकावून, समाजाच्या स्वत्व व स्वाभिमानाला, धर्म व संस्कृतीला, आचार-विचार व कार्याला केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर आवश्यक पाठबळ देणारी एक संस्था गोव्यांत असावी हें पोर्तुगीज राज्यकर्त्यांना खपलें नाहीं आणि मठ नांवाची संस्था उपटून काढण्यासाठीं त्यांनी एक कारस्थान रचलें.

परकी सरकारने गोमंतभूमींत आपले पाय घट्ट रोवण्यासाठी यच्चयावत् हिंदू देवमंदिरें व मठ अत्यंत निष्ठुरपणे जमीनदोस्त केले व त्यांना वश न झालेल्या हिंदु समाजाला देशोधडीला लावले. त्या राजवटीकडे धार्मिक क्षेत्रांतील मठाचें स्थान व मान टिकविण्यासाठी दोन हात करण्यांत कोणताच अर्थ नाही असें त्या काळचे समाजांतील कांहीं गृहस्थ मानीत होते. त्या साहसापासून श्रीपद्मनाभतीर्थांना परावृत्त करण्याचे प्रयत्न

तर त्यांनी केलेच, त्याशिवाय स्वामीजींच्या वाट्याला अपयश आलें तर त्यामुळें आपणावर सरकारची खप्पामर्जी होऊं नये या विचाराने ते अविवेकीपणे सरकारी डावपेंचाना साह्यभूत बनूं लागले. अशा परिस्थितींत श्रीपद्मनाभतीर्थांना एकाकीपणें झुंज द्यावी लागली. पण मूठभर निष्ठावंत मठानुयायी या दिव्यांत स्वामीजींच्या पाठीशीं खंबीरपणे राहिले हेहि नमूद करणे योग्य होईल.

दि. ७ मे १८५२ रोजीं पोर्तुगीज सरकारने एक आदेश ( पोर्तारीय क्र. ६७) जारी करून श्रीसंस्थान गोकर्ण मठाच्या एकंदर मालमत्तेचा कारभार संभाळण्यासाठीं एक समिति नियुक्त केली. या समितीमध्ये सारे हिंदू गृहस्थ ठेवून आपला विरोध हिंदू धर्मास नाहीं असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्नहि केला. परंतु श्रीस्वामीजींनी पोर्तुगीज सरकारच्या संभाव्य डावपेंचाची पूर्व-कल्पना समाज प्रतिनिधींना देऊन ठेवलेली असल्याने सरकारी समितीवर काम करण्यास गृहस्थ मंडळी राजी होईना. वर्षभर समिति निष्क्रिय राहिली.

सरकारची अशी भूमिका होती कीं, मठ या संस्थेशीं स्वामीजींचा कोणताच संबंध नसून मठावर सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मठ म्हणजे श्रीरामदेवाचे मंदिर असाही तर्क मांडण्यांत आला. पण सरकारच्या ह्या भूमिकेला समाजाकडून पाठिंबा मिळाला नाही आणि आपला हेतू तडीस नेण्यास उताविळे झालेल्या सरकारने दि. २२ एप्रिल १८५३ रोजी दुसरा आदेश (पोर्तारीय क्र. ५५) जारी करून पहिली समिति विसर्जित केली व नवी समिति नियुक्त केली.

सरकारच्या या निर्धारामागे कुणाची तरी फूस असावी असा संशय त्यावेळी व्यक्त करण्यांत आला. कारण समाजांतील कांही लोक सरकारी आदेशापुढे नमते घेण्याचा सल्ला स्वामीजींना देऊ लागले होते. परंतु श्रीपद्मनाभतीर्थांनी आपली भूमिका सोडली नाही. स्वामीजी ही एक व्यक्ति नसून समाजाच्या सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक गरजांकडे लक्ष पुरविणारी एक संस्था आहे आणि प्राचीन भारतांत ऋषि मुनि जी कामगिरी बजावीत तीच आधुनिक युगांत मठाधीश बजावीत आहेत असा दावा करून आपली बाजू सरकारपुढे मांडली.

परंतु पोर्तुगीज सरकारला येन केन प्रकारे मठाच्या कारभारांत आपलें नियंत्रण हवे होतें. राज्यकर्त्यांनी श्रीस्वामीजींच्या विरोधाची दखल घेतली नाहीं आणि मठाचा कारभार सांभाळण्यासाठीं दि. ३१ मे १८५६ रोजीं (पोर्तारीय क्र. ७५) आदेश जारी करून तिसऱ्यांदां समितीची नेमणूक केली. पण या समितीने देखील मठाच्या कारभाराचा ताबा स्वतःकडे घेण्याचें काम सतत लांबणीवर टाकलें.

भारतीय समाजांत सारस्वत संप्रदायाचा इतिहास व त्या संप्रदायाने केलेल्या

कामगिरीचा एक विस्तृत अहवाल श्रीपद्मनाभतीर्थांनी तयार केला. देवमंदिरांभोवतीं विकसित झालेली समाज व्यवस्था हे सारस्वत संप्रदायाचें वैशिष्ट्य असून त्या सर्व देवमंदिरांचे कारभार धर्मशास्त्राने घालून दिलेल्या नियमानुसार चालतात याची दक्षता घेण्याचें काम गुरूपीठें करीत असतात. पीठाधीश हे संन्यस्त वृत्तीचे, विरक्त तपस्वी असतात आणि सर्वसंगपरित्याग करून निरपेक्ष वृत्तीने धर्म व समाजाच्या विश्वस्ता सारखे ते वागतात असे मुद्दे श्रीपद्मनाभतीर्थांनी पोर्तुगीज सरकार समोर मांडले.

श्रीपद्मनाभतीर्थ यांनी मांडलेले मुद्दे तर्कशुद्ध होते; पण सरकारचे ईप्सित वेगळे असल्याने त्या आक्षेपांकडे दुर्लक्ष केलें गेलें.

## निर्वाणीचा इशारा

सरकारने पुढचें पाऊल उचलण्यापूर्वीं समाज संघटीत करण्याचा विचार करून श्रीपद्मनाभतीर्थांनी पर्तगाळी मठांत मठानुयायी वर्गाच्या प्रतिनिधींची एक सभा बोलावली. या सभेंत त्यांनी समाजाला निःसंदिग्ध शब्दांत असें सांगितलें कीं मठाचा मान सांभाळण्याच्या कामांत समाजाकडून सहकार्य मिळालें नाही व मठाच्या कारभारांत सरकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप सुरू झाला तर गोव्यांतील मठांत वास्तव्य करण्याचें सोडून आपण गोकर्ण येथील मठांत जाऊन राहाणे पसंत करीन. तथापि मठानुयायी वर्गाला मठाबद्दल अभिमान असेल व आपणास ते आवश्यक सहकार्य देणार असतील तर सरकारशीं झुंज देण्यास आपण संकोच करणार नाहीं.

स्वामीजींच्या या निर्वाणीच्या इशाऱ्याचा योग्य परिणाम झाला आणि उपस्थित मठानुयायांनी या संघर्षांत स्वामीजींना संपूर्ण निष्ठा व सहकार्य देण्याची प्रतिज्ञा केली.

गोवा प्रदेशांतील श्रीमठाच्या वास्तूंचे भवितव्य अधांतरी लोंबकळत असतानाच सरकारी प्रयत्नामुळें समाज व मठामध्यें दुहीचीं बिजें पेरली जातील याची श्रीपद्मनाभतीर्थांना चिंता वाटत होती. गोवा प्रदेशाबाहेर श्रीसंस्थानचे अनेक मठ होते व गोव्यांतील मठांच्या कारभारांत पोर्तुगीज सत्ताधीशांचा हस्तक्षेप होऊं लागल्यास मठाचे मुख्यालय गोव्याबाहेर हलविण्याचा पर्याय स्वामीजींसमोर होता. परंतु मठ किंवा समाज दुबळा पडल्याची ती कबुली ठरली असती. स्वामीजींच्या स्वाभिमानाला ती गोष्ट मान्य होण्यासारखी नव्हती. प्रश्न केवळ राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप थोपविण्यापुरता नव्हता, तर समाजहृदयांतील स्वाभिमानाची ज्योत पूर्ववत प्रज्वलित करून समाजाची एकजूट दृढतर करण्याचाहि होता. त्याच कारणासाठीं त्यांनी एकीकडे पोर्तुगीज सरकारशीं न्यायनीति व कायद्याच्या चौकटींत अहिंसक लढा चालू ठेवला तर दुसरीकडे समाज जागृती व संघटनेच्या कार्यांत खंड पडूं दिला नाहीं. समाजांत दुही राहिली अथवा

स्वाभिमान निस्तेज झाला असतां आपल्या कारकिर्दीत श्रीमठासमोर जें आव्हान उभें राहिलें तशीं आव्हानें पुन्हा येऊं शकतील. यास्तव केवळ तात्कालिक प्रश्न सोडवून भागणार नाहीं याचा विचार करूनच श्रीपद्मनाभतीर्थ पावले उचलीत होते.

समाज हळुहळू संघटीत होऊ लागला आणि समितीच्या सदस्यांच्या असहकारामुळे मठाचे नियंत्रण सरकारकडे प्रत्यक्ष असे कधीच गेले नाही. त्यावेळी काणकोण महालांत वेगळा प्रशासक नव्हता आणि काणकोण विभागाचा कारभार फोंडा येथील प्रशासक (आद्मिनिस्त्रादोर) पहात होते. सरकारचा आदेश कार्यवाहींत आणण्यास ते उत्सुक होते व त्यांनी स्थानिक प्रतिनिधींमार्फत श्रीमठांतील स्थावर व जंगम मालमत्तेची एक यादी तयार करवून घेतली.

लागोपाठ तीन समित्यांची नियुक्ति करूनहि श्रीमठाच्या काभारावर नियंत्रण येत नाहीं या गोष्टीचा परिणाम हळुहळू सरकारवर होऊं लागला. दरम्यानच्या काळांत सरकारने उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याला चपखल उत्तर देऊन सरकारी हस्तक्षेप दूर करण्यासाठीं श्रीपद्मनाभतीर्थ यांचे प्रयत्न चालूच होते. दुसरीकडे या कालावधींत श्रीमठाच्या शेतीबागायतींची आबाळ होऊन मठाचे उत्पन्नहि घटूं लागले. सरकारी हस्तक्षेपानंतर मठाच्या उत्पन्नांत कशी घट होत आहे हे श्रीपद्मनाभतीर्थांनी पुराव्यानिशीं पोर्तुगीज गव्हर्नरांच्या निदर्शनास आणून दिलें तेव्हां गव्हर्नर जनरलांनी दि. १३ डिसेंबर १८५९ रोजीं एक खास अध्यादेश (पोर्तारीय क्र. ९७१) जारी करून श्रीमठाचा कारभार सन्मानपूर्वक श्रीपद्मनाभतीर्थांच्या हवालीं केला. एका चिवट झुंजीचा तो गोड शेवट होता. परंतु तेवढ्याने हें प्रकरण कायमचें मिटलें नाहीं.

इ. स. १८८० मध्यें काणकोण तालुक्यासाठीं स्वतंत्र आद्मिनिस्त्रादोर (प्रशासक) नियुक्त करण्यांत आला. तत्पूर्वी गोव्यांतील हिंदू देवस्थानांसाठीं सरकारने एक निराळा कायदा तयार केला होता. पर्तगाळी मठांत श्रीराममंदिर असल्याने त्या मंदिराची व पर्यायें श्रीमठाची एक स्वतंत्र नियमावलि (कॉम्प्रोमिस) तयार करून ती सरकारच्या मंजुरीसाठीं पाठविण्याचा आदेश काणकोणच्या प्रशासकांनी दिला.

श्रीपद्मनाभतीर्थांनी एकीकडे मठाची स्वतंत्र घटना तयार करण्यास आरंभ केला खरा; पण देवस्थानांचा कायदा मठाला लागू केल्याने भविष्यकाळांत कोणत्या कटकटी निर्माण होऊं शकतील तें हेरून सरकारशीं वाटाघाटी चालू ठेवल्या.

दि. ४ जुलै १८८१ रोजीं श्रीस्वामीजींनी गोव्याच्या गव्हर्नर जनरलांना एक सविस्तर पत्र पाठवून आपली बाजू मुद्देसूदपणे मांडली. मठ या संस्थेची व्यवस्था कशाप्रकारची आहे आणि समाजांत मठाचें कार्य कोणते याची सविस्तर माहिती या पत्रांत नमूद करून काणकोण प्रशासकांचा आदेश मागे घ्यावा व यापुढे सरकारने

मठाच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये अशी मागणी त्या पत्रांत करण्यांत आली होती.

## वादावर अंतिम पडदा

पत्र पाठवून श्रीपद्मनाभतीर्थ स्वस्थ बसले नाहींत तर ते स्वतः पणजींत ठाण मांडून बसले आणि मध्यस्थांमार्फत तत्कालीन गव्हर्नर जनरलांशीं वाटाघाटी सुरू केल्या.

या वाटाघाटींचा इष्ट परिणाम झाला आणि दि. ६ जुलै १८८१ रोजीं गव्हर्नर जनरलनी आपल्या अधिकारांत असा आदेश जारी केला कीं श्रीमठ ही एक स्वतंत्र संस्था असून त्या संस्थेचा देवालयाच्या कायद्यांत समावेश करतां येणार नाहीं. मठाचें स्वातंत्र्य अबाधित राहिलें पाहिजे व मठाच्या कारभाराचे सर्वाधिकार श्रीस्वामीजींकडेच रहातील असे नमूद केलें. इतकेच नव्हे तर गोव्यांतील देवस्थानांच्या कारभारांत तंटे अथवा मतभेद उपस्थित झाल्यास पर्तगाळ मठाधीशांचा निवाडा अंतिम व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील असेंहि जाहीर करून टाकलें.

गव्हर्नर जनरलचा हा आदेश त्यांच्या अधिकारकक्षेबाहेर आहे अशी कुरापत कांहीं असंतुष्टांनी काढली असतां श्रीपद्मनाभतीर्थांनी या आदेशाला पोर्तुगाल मधील संबंधित मंत्रालयाची पुष्टि मिळवून हा प्रश्न कायमचा निकालांत काढण्याचा निर्धार केला आणि त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन ११ ऑगष्ट, १८८३ रोजीं लिस्बन येथें पोर्तुगीज सरकारने गव्हर्नरच्या आदेशावर शिक्कामोर्तब करणारा आदेश जाहीर केला. त्या आदेशांत सर्वसंगपरित्याग केलेले संन्यासी हे त्यागी जीवन जगतात व सर्वसामान्य गृहस्थांहून त्यांचें जीवन वेगळें व विरागी असतें. नियतीने सोंपविलेली गुरूपदाची भूमिका पार पाडतांना जरी मठाधिपतींना आर्थिक व सामाजिक व्यवहार पहावे लागत असले तरी शिष्य परिवाराला मानसिक स्वास्थ्य लाभावें, परिवारांत धर्म व धार्मिकतेचा, न्याय व नीतीचा प्रसार व्हावा यासाठींहि त्यांना प्रयत्नशील रहावें लागतें, ही श्रीपद्मनाभतीर्थांची भूमिका उचलून धरली. हा आदेश सरकारी राजपत्रांत दि. १७ सप्टेंबर १८८३ रोजीं प्रसिध्द करण्यांत आला.

एक प्रकारें सरकार विरुद्ध केलेल्या संघर्षाच्या अग्निदिव्यांतून श्रीपद्मनाभतीर्थ चोख सुवर्णासारखे तावून सुलाखून निघाले. म्हणूनच अखंड गौरवशाली परंपरेचा इतिहास असलेली श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ ही संस्था व मठाचे अनुयायी उन्नत माथ्यानें स्वाभिमानी जीवन जगूं शकले. त्या दृष्टीने आज मठ नांवाची गौरव व वैभवरूपी जी भव्य वास्तु उभी आहे, तिचा स्थिर व बळकट पाया श्रीपद्मनाभतीर्थांनी घातला असें म्हटल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं.

## एक वेगळा प्रसंग

श्री पद्मनाभतीर्थांच्या कारकीर्दीत अनेक सामाजिक प्रश्न उपस्थित झाले आणि त्यांनी ते अत्यंत कौशल्याने सोडविले. परंतु त्यांच्या कारकीर्दीतील एका विशेष घटनेचा उल्लेख आवश्यक आहे.

पर्तगाळी मठाच्या या वैभवावर सरकारचा स्वार्थी डोळा पडला याचें आश्चर्य नाहीं. हिंदु धर्मियांची एक मातब्बर संस्था त्यांच्या डोळयांत जशी खुपूं लागली त्याप्रमाणे पर्तगाळी सारख्या रानांत असलेले हें धन उचलून नेण्याचा मोह इतरांनाहि झाला.

सत्तरींतील राणे पोर्तुगीज सरकारविरुद्ध सशस्त्र बंड करून उठले होते. शस्त्रास्त्रासाठीं पैशाची गरज लागली म्हणजे ते स्वकियांच्या घरांवर दरोडे घालीत. पर्तगाळी मठावर दरोडा घातला तर सुवर्णमुद्रा व अलंकार मुबलक मिळतील असा विचार करून एकदां ते मठांत घुसले. त्यावेळीं श्रीपद्मनाभतीर्थ पीठावर होते. बंदुकीचा धाक घालून राण्यांनी अर्चकाला कुशावती नदीतीरीं नेलें आणि अलंकार-ऐवज कुठे आहेत हें सांगितलें नाहीं तर ठार करण्याची धमकी दिली. अर्चकाने आपणास काहीं माहीत नाहीं, तें सर्व स्वामीजींनाच माहीत आहे असे उत्तर दिलें. राण्यांनी अर्चकाला सोडून दिलें व ते स्वामीजींची भेट घेण्यासाठीं पुन्हा मठाच्या दिशेने येऊं लागले. दुरूनच त्यांना स्वामीजींचे दर्शन घडलेलें असावें. एकाएकीं त्यांचे हृदय परिवर्तन झालें आणि बंदुका तेथेंच टाकून व माना खालीं घालून ते निघून गेले.

गुरुवर्य श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ यांची कार्यपद्धती वेगळी होती. संचारकाळांत ते एखाद्या मुक्कामाला पोहचत. तेथील मठानुयायी वर्गाचीं सुख दुःखें जाणून घेत. त्यांना योग्य मार्गदर्शन करीत आणि त्यांच्या गरजा लक्षांत घेऊन एखाद्या कार्याला चालना देत.

अनेक ठिकाणी ज्ञातीतील देव मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी वा अशा मंदिरांमध्ये पूजा, उपासना अव्याहत चालावी म्हणून तरतूद करण्यासाठी सुवर्णमुद्रांच्या रूपान ते दान देत व पुढील संचाराला जात. दिलेल्या दानाचा विनियोग कसा झाला यावर नजर ठेवण्याची जबाबदारी श्री पद्मनाभतीर्थांना उचलावी लागे.

शके १७७४ मध्ये श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ काशी यात्रेला गेले होते. तेथे गंगा किनारी श्रीसंस्थानचा एक मठ आहे. त्या मठांत नित्य ब्राह्मण संतर्पण चालविण्यासाठी त्यांनी काशी नरेशांकडे सहा हजार रुपयांची ठेव ठेवली. कांही काळ हे अन्नसत्र चालले व नंतर एकाएकी बंद पडले.

प्रत्येक मठ व उपमठाकडूनच नव्हे तर विविध ठिकाणी विखुरलेल्या समाजबांधवांकडून त्या त्या ठिकाणच्या कार्याचा अहवाल श्रीपद्मनाभतीर्थ आग्रहाने मिळवीत. आणि जेथे जेथे शैथिल्य किंवा त्रुटि दिसेल तेथे योग्य पावले उचलून कार्य

गतिमान करीत. काशी येथील स्वकीय मठांतील ब्राह्मण संतर्पण बंद पडल्याचे समजताच स्वामीजींनी काशी नरेशांकडे पत्रव्यवहार सुरू केला. राजे साहेबांकडून उत्तर आले नाही तरी ते स्वस्थ बसले नाहीत. अन्नसत्र पूर्ववत सुरू व्हावे आणि तसे करणे काशी नरेशांना शक्य होत नसेल तर गुरुवर्यांनी राजेसाहेबांच्या कोषांत जमा केलेली रक्कम परत मिळावी अशी त्यांची मागणी होती. सतत दोन वर्षे स्मरणपत्रे पाठवलीं व शेवटीं एकामागून एक असे दोन प्रतिनिधी काशीला पाठवून त्यांनी दरवर्षी नरेशांकडून व्याज वसूल करून अन्नसत्र चालू ठेवण्याचा आदेश त्यांना दिला. या प्रकरणाचा निवाडा श्रीपद्मनाभतीर्थांच्या कारकीर्दींत लागला नाहीं, पण पुढे त्याचा पाठपुरावा त्यांचे शिष्य श्रीइंदिराकांततीर्थांनी केला व अन्नसत्रासाठीं राजाच्या तिजोरींत जमा केलेली रक्कम परत मिळविली.

## धीरगंभीर प्रकृतीचे आचार्य

एरवीं श्रीपद्मनाभतीर्थ हे धीरगंभीर प्रकृतीचे. शिष्यपदावर ते आले त्यावेळीं त्यांचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. त्या बालवयांतच गुरूवर्य श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांकडून योग्य संस्कार मिळाल्यानें त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण व घडण वेगळ्या पध्दतीनें होत राहिली. विद्वत्ता व विरक्ती हे गुरूवर्यांचे स्थायी भाव. शिष्यांनी हे दोन्ही गुण बालवयांतच आपल्या अंगीं बाणविण्यासाठीं प्रयत्न केले आणि कालांतरानें ते त्यांच्या व्यक्तिमत्वाचे स्वाभाविक भाग बनले. परंतु आपल्या वैयक्तिक साधनेद्वारे आणखी कांहीं सिध्दि श्रीपद्मनाभतीर्थांनी गुरूंच्या कारकीर्दींतच प्राप्त करून घेतल्या. त्यांची शिस्त वाखाणण्या सारखी होती. प्रत्येक लहान-सहान गोष्ट नियोजित वेळीं व निर्धारित प्रमाणांत व्हावी आणि कुठेंच त्रुटि किंवा अतिरेक होऊं नये याबद्दल त्यांचा कटाक्ष असायचा. अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या ज्या वृत्तीचें त्यांनी कसोटीचे वेळीं दर्शन घडविलें ती त्यांच्या थोरवीची निदर्शक म्हणतां येईल.

श्रीमठाच्या अस्तित्वाला परकी राजसत्तेने जेव्हां आव्हान दिलें व मठ संस्थेच्या मुळावरच प्रहार करण्यासाठीं पावलें उचलण्यास आरंभ केला त्यावेळीं धीरगंभीर प्रकृतीच्या या आचार्यांनी संयम किंवा सहिष्णुता भंग पावूं न देतां प्रक्षोभक परिस्थितींतहि मनाचा समतोल अथवा विवेक ढळूं न देतां पोर्तुगीज राजवटीकडे जी झुंज दिली ती श्रीमठाच्या इतिहासांत अभूतपूर्वच म्हणावी लागेल.

परंपरेंतील प्रत्येक गुरुवर्यांनी मठाच्या आध्यात्मिक उन्नतीला महत्त्वाचा व आपापल्या कालानुरूप हातभार लावला. किंबहुना असे म्हणतां येईल कीं, ज्या काळांत ज्या प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या त्या समस्यांना समर्थपणें तोंड देण्याची शक्ति असलेले स्वामी या मठाला लाभले. म्हणूनच तर मठाचें वैभव व कीर्ति बदलत्या

संवत्सराबरोबरच वृद्धिंगत होत राहिली.

प्रत्येक मठ व उपमठ आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतेच अशांतला भाग नाहीं. अनेक ठिकाणीं आपला समाज गरिबावस्थेंत राहात होता आणि त्याला नैतिक, सांस्कृतिक व आध्यात्मिकच केवळ नव्हे तर अधूनमधून आर्थिक साह्याचीहि आवश्यकता भासायची. अडलेल्यांना मदत करणे आणि मठाचीं अंगीकृत कार्यें सुरळीतपणें चालविण्याशिवाय मठवास्तूची देखभाल व मठमंदिरांतील नित्यनैमित्तिक धार्मिक विधि व उत्सव चालविण्यासाठीं मठ आर्थिक दृष्ट्या सुस्थितींत ठेवणे आवश्यक होतें. परंपरेतील अनेक आचार्यांनी हें काम उत्तम रीतीने केलें. जेथे जेथे शक्य झालें तेथे समाजाने वैयक्तिक व सामुदायिक रीत्या सेवा व दानाच्या रूपाने मठाची समृद्धि वाढविली. प्रत्येक मठाच्या कक्षेंत शेती-बागायतीच्या जमिनी ठेवण्यांत आल्या. त्याचप्रमाणें मठवास्तूचे विकास व विस्तार करण्यांत आले. देव दैवतांच्या अलंकारांतहि सतत भर पडत राहिली.

## अन्य मठांशीं स्नेहवृध्दि

गोव्यांतील हिन्दु समाज, विशेषतः सारस्वत समाज असुरक्षित जीवन जगत आहे आणि समाजावरील संभाव्य आघातांना तोंड देण्यासाठी हा समाज संघटित होणे जरूरीचे आहे, हे ओळखून श्री पद्मनाभतीर्थांनी समाज संघटनेच्या दिशेने पावले उचलली होतीच; पण त्याशिवाय पोर्तुगीजांच्या आधिपत्याबाहेरील भागांत राहाणाऱ्या सारस्वत समाजाची गोव्यांतील समाजाकडील एकजूट दृढ झाली तर भविष्यकालिन आपत्तीच्या वेळी एक समर्थ संघटित शक्ती तयार झालेली असेल, असा विचार करून त्यांनी कर्नाटकाच्या विविध भागांत विखुरलेल्या समाजाचे श्रीमठामार्फत गोव्याकडील समाजाशी संबंध जोडण्याचे शिस्तबध्द प्रयत्न केले.

सारस्वत समाज हा विविध संप्रदायांच्या मठांमध्ये विभागलेला असल्याने समाजातील एकजूट वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने विविध मठांमध्ये स्नेहसलोखा निर्माण होणे जरूरीचे आहे हे त्यांनी ओळखले आणि त्या दृष्टीने इतर मठाधीशांशी आणि अनुयायांशी सतत संपर्क ठेवला. त्यातही वैष्णव संप्रदायाचा दुसरा मठ म्हणजे काशी मठ होय. मुंबई पासून त्रिवेंद्रम पर्यंत विखुरलेल्या सारस्वत समाजात श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी व श्रीसंस्थान काशीमठ या दोन मठांच्या अनुयायांची संख्या फार मोठी होती. एकदा वैष्णव संप्रदायातील दोन प्रमुख मठांमध्ये स्नेहसलोखा वाढीस लागला म्हणजे सारस्वत एकात्मतेच्या कार्याला अनुकूल वातावरण निर्माण होईल हा श्रीस्वामीजींचा अंदाज एकदम बरोबर होता.

श्रीपद्मश्रीपद्मनाभतीर्थांनी त्या दृष्टीने काशीमठाधीश श्री भुवनेंद्रतीर्थ यांच्याशी संपर्क साधला आणि शिरशी, सिध्दापूर, यल्लापूर यांसारख्या शहरांमधील संप्रदायाच्या देवस्थानांमध्ये त्यांच्यासह वास्तव्य करून स्नेहसलोख्यासाठीं अनुकूल वातावरण तयार केले. या वेळीं उभय मठाधीशांमध्यें झालेल्या चर्चेत काशीमठाचे शिष्यस्वामी श्रीवरदेन्द्रतीर्थ यांनाहि सहभागी करविले. पुढें श्रीवरदेन्द्रतीर्थां समवेत श्रीपद्मनाभतीर्थांनी उल्लाळ, मुल्की, गुरूपूर सारख्या ठिकाणीं संचार करून उभय मठानुयायांमधील दुरावा दूर केला.

## कांहीं ठळक कार्ये

श्रीपद्मनाभतीर्थ यांच्या कारकीर्दीत श्रीमठकक्षेतील अनेक मठ व उपमठांमध्ये तसेच देवस्थानांमध्ये जीर्णोध्दार, देवप्रतिष्ठा आदि कार्ये लहान-मोठ्या प्रमाणात होतच राहिलीं. ज्या ज्या वेळी एखादे महत्त्वाचे काम हाती घ्यावे लागले त्या त्या वेळी श्रीस्वामीजींनी त्या ठिकाणी यात्रा करून वाटेत परिसरातील शिष्यपरिवाराशी संपर्क प्रस्थापित केला.

असेच एक महत्वाचे कार्य म्हणजे पर्तगाळ मठांतील श्रीरामदेवालयाचे शिखर ताम्रपत्राने मढविण्याचे काम श्रीपद्मनाभतीर्थांनी स्वतःच्या देखरेखीखाली करवून घेतलें.

मठाकडे नापीक जमीन पुष्कळ होती. ती योग्य प्रकारे लागवडीखाली आणण्याच्या दृष्टीने श्रीस्वामीजी अविरत प्रयत्नशील राहिले. बरवळो परिसरात त्यांनी माड, आंबा, फणस यांसारख्या झाडांची लागवड केली आणि त्या बागायतीला पाणी पुरवठा व्हावा या दृष्टीने एक चिरेबंदी तलाव बांधून घेतला. अतिथी अभ्यागतांसाठीं त्याच ठिकाणीं एक अग्रशाळाही उभारली.

इनामागाळ ही अशीच दुसरी उपेक्षित जमीन होती. श्रीपद्मनाभतीर्थांनी डोंगर माथ्यावरून वाहणारे पावसाचें पाणी अडवून त्याचे प्रवाह शेतीं-बागायतींचे सिंचन करण्यासाठीं वळविलें. अल्पावधीतच त्या भागात भातशेतीचे चांगले पीक येऊं लागले आणि माड, आंत्रा व फणस यांसारखे फळांचे उत्पादनही विपुल प्रमाणांत वाढले.

समाजाकडील संपर्क जसजसा वाढत राहिला तसतसे श्रीमठांतील उत्सवासाठी विविध भागांतील मठानुयायी मोठ्या संख्येने येऊं लागले. उत्सव व संतर्पणे असलीं म्हणजे स्वयंपाक व भोजनासाठी जागा अपुरी पडूं लागली. ही अडचण लक्षांत घेऊन श्रीपद्मनाभतीर्थांनी पर्तगाळी मठांत एक विस्तृत भोजनशाळा व स्वयंपाकघर बांधून घेतले.

श्रीमठांतील उत्सव भव्यतेने साजरे व्हावे आणि देवप्रतिमेची शोभा वाढावी या दृष्टीने श्रीस्वामीजींनी कांहीं सुधारणा घडवून आणल्या. आरध्यदैवत श्री वीरविट्ठल

आणि श्री रामदेव यांच्या प्रतिमांसाठी नवे सुवर्णालंकार करवून घेतले. उभय दैवतांच्या सोन्याच्या प्रभावळी, गिंदलासोर, शालिग्राम ठेवण्यासाठी एक मोठे संपुष्ट, तीर्थासाठी मोठे पंचपात्र व पळी, दोन चामरे इत्यादि वस्तू श्रीपद्मनाभतीर्थांच्या कारकिर्दीत करण्यात आल्या.

मठाचा कारभार सांभाळूनही कधी शिष्य परिवाराच्या विनंतीवरून तर कधी आत्मप्रेरणेने श्रीपद्मनाभतीर्थ लहान-मोठ्या यात्रा करीतच होते. दक्षिण भारतात श्री रामेश्वर, मदुराई, विष्णुकांची व तिरूपतीच्या यात्रा त्यांनी केल्या आणि रामेश्वर क्षेत्री पश्चिम विधीत श्री मुख्यप्राण देवाची प्रतिष्ठापनाही स्वहस्तें केली.

चातुर्मास व्रताचरणासाठी एकदा बिळगी (सिध्दापूर) या स्थलाची तर एकदा तुंगा नदीकिनारी तीर्थहळ्ळीची त्यांनी निवड केली. मंगळूर येथील स्वकीय मठीही त्यांनी चातुर्मास व्रताचरण केले. संघर्षमय कारकिर्दीतही समाजाकडे, मठमंदिरांकडे आणि आपल्या स्वधर्मनियमांच्या पालनाकडे दुर्लक्ष होऊं न देता वाट्याला आलेले शारीरिक व मानसिक क्लेष हंसतमुखाने सहन करीत श्रीपद्मनाभतीर्थांनी श्रीमठाची उत्तम सेवा केली.

श्री पद्मनाभतीर्थ शके १८०१ मध्ये गुरुपदावर आले आणि शके १८०८ मध्ये वैशाख शुध्द दशमीच्या शुभ मुहूर्तावर त्यांनी शिष्य स्वीकार केला. पूर्वाश्रमीच्या भगिनीच्या पुत्राकडे त्यांचे लक्ष वेधून होते. शिष्य म्हणून आपल्या भाच्याची निवड त्यांनी कधींपासून मनांत पक्की करून ठेवली होती.

तेच भटकळ येथील चारित्र्यवान व विद्वान अशा पुराणिक कुटुंबांतील तेजःपुंज व निःस्पृह पुत्र रामकृष्ण होत. निवड करण्यात आली त्यावेळी शिष्याचे वय १५ वर्षांचे होते. संन्यासदीक्षेनंतर बटूला श्रीमद् इंदिराकांततीर्थ असे नांव देण्यात आलें.

एकीकडे सरकारकडील तंट्याचा तगादा चालू असतानाच श्रीमद् इंदिराकांत तीर्थांना योग्य शिक्षण व संस्कार देण्याची निकड गुरुवर्यांना भासत होती. आपल्या व्यापातून मुद्दाम वेळ काढून गुरुस्वामी शिष्यांच्या अध्ययनाकडे लक्ष देत. तरी देखील आपल्या कार्यबाहुल्याचा शिष्यांच्या अध्ययनावर विपरीत परिणाम होऊं नये असा विचार करून एका प्रख्यात पंडिताची योजनाहि त्यांनी केली.

ज्या पद्धतीने व ज्या घाईने श्री पद्मनाभतीर्थ आपल्या शिष्यांना वेद, षड्दर्शनि स्मृतिग्रंथ, पुराणे इत्यादि विषयात पारंगत करीत ते पाहता त्यांची योजना काही वेगळी आहे याची जाणीव निकटवर्तीयांना यावयाची. अधून-मधून गुरुवर्य शिष्य-स्वामींना सामाजिक व्यवस्थेची आणि समाजांतील विविध प्रश्नांची माहिती देत आणि मठसंस्थानाच्या व्यापाची व व्यवहाराचीही कल्पना देत. शिष्यांवर त्यांचे इतके अलोट

प्रेम आणि त्यांच्या विद्वत्तेचे इतके अपार कौतुक की अधून-मधून आपण श्रोत्याची भूमिका घेऊन शिष्य स्वामींना पुराण, प्रवचन सांगण्यास लावत आणि त्यांची रसाळ वाणी व मधुर शैली ऐकून इतर श्रोतृवृंदाप्रमाणेच संतुष्ट होत.

गुरुवर्य पद्मनाभतीर्थ यांचा प्रेमळ सहवास शिष्य श्रीइंदिराकांताना सहा वर्षे लाभला. आपल्या उत्तराधिकाऱ्याच्या हाती श्रीमठाचे व समाजाचे भवितव्य सुरक्षित आहे असा आत्मविश्वास गुरूंना वाटूं लागला आणि आषाढ शुद्ध सप्तमी शके १८१४ रोजी ते वृंदावनस्थ झाले.

✿✿

## श्रीपद्मनाभतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी


| | | |
|---|---|---|
| **जन्मतिथि** | : | श्रीशके १७५२ (गणितसाधित) |
| **जन्मस्थळ** | : | होन्नावर |
| **संन्यास-दीक्षा** | : | माघ शु।। ५ मी शके १७६१ |
| **गुरुवर्य श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांच्या मुक्तीची तिथि** | : | ज्येष्ठ शु।। २या शके १८०१ |
| **शिष्यस्वामी पदावरील कार्यकाळ** | : | ३९ वर्षे ४ महिने |
| **श्रीगुरुपीठारोहण** | : | ज्येष्ठ शके १८०१ |
| **गुरुपदावरील कार्यकाळ** | : | १३ वर्षे १ महिना ५ दिवस |
| **श्रीमठसेवेसाठीं अर्पिलेला कार्य काळ** | : | ५२ वर्षे ५ महिने |
| **शिष्य श्रीमद् इदिराकांततीर्थांना संन्यास दीक्षा** | : | वैशाख शु।। १० मी शके १८०८ |
| **महानिर्वाण** | : | आषाढ शु।। ७ मी शके १८१४ |



गुरूवर्य श्रीपद्मनाभतीर्थांकडून शिष्य श्रीइंदिराकांततीर्थांना आश्रमदीक्षा

विष्णु : सर्वोत्तम : सेव्यो। वायुर्जीवोत्तमोऽपिव :॥

# श्रीसंस्थान गोकर्ण - पर्तगाळी - जीवोत्तम मठ



पर्तगाळी येथील श्रीपद्मनाभतीर्थांचें वृंदावन